# सोलापूर विद्यापीठ

**परीक्षा विभाग**

सोलापूर पुणे नॅशनल हायवे, केंगाव,
सोलापूर - ४१३ २५५
फोन नं. (ईपीएबीक्स नं.) ०२१७-२७४४७७८
फॅक्स नं.०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ:http://su.digitaluniversity.ac
ई-मेल: coesolapur@yahoo.in

# Solapur University

**Examination Section**

Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
(EPABX No.) Ph.No.0217-2744778,
Fax No.0217-2744770
Web Site : http://su.digitaluniversity.ac
email id: coesolapur@yahoo.in


**संदर्भ क्रं. सोविसो/परीक्षा/२०१५-१६/ ७९** **दि. ०६/०५/२०१५**

**प्रति,**
**मा. संपादक.**
**सोलापूर शहरातील सर्व दैनिक वृत्तपत्रे**
**सोलापूर.**

**विषय :- प्रेस नोट बाबत**

**महोदय,**

**आपल्या लोकप्रिय दैनिकातून सोबत प्रमाणे वृत्त प्रसिध्द करून सहकार्य करावे ही विनंती .**

**कळावे.**

**आपला विश्वासू,**

**(बी. पी. पाटील)**
परीक्षा नियंत्रक

**प्रेसनोट :**

## सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल जाहीर होण्यास सुरवात !

सोलापूर : केवळ एका जिल्हयासाठी असणारे सोलापूर हे देशातील एकमेव विद्यापीठ आहे. हे विद्यापीठ एक आदर्श विद्यापीठ व्हाव व इतर सर्व विद्यापीठासाठी रोल मॉडेल व्हाव. या दूरदृष्टी च्या विचारातूनच या विद्यापीठाची स्थापना झाली आणि त्याचाच प्रत्यय सोलापूर विद्यापीठाच्या अनेक नवनविन प्रयत्नामधून येत आहे.

### * उत्तर पत्रिका फेरतपासणींचे निकाल वेळेत जाहीर.

ऑक्टोंबर/ नोव्हेंबर/डिसेंबर, २०१४ मध्ये झालेल्या विविध विद्याशाखांच्या उत्तरपत्रिका छायांकित प्रति मिळाल्यानंतर असणारी प्रक्रीया म्हणजे उत्तर पत्रिका फेरतपास**णी** होय. विद्यापीठ परीक्षा विभागाने या वर्षी सर्वच विद्याशाखांच्या उत्तर पत्रिका फेरतपासणींचे निकाल पुढची सत्र परीक्षा सुरू होण्यापूर्वी वेळेत जाहीर केले आहेत. त्यामुळे जे विद्यार्थी उत्तरपत्रिका फेरतपासणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत, त्यांना त्या विषयाचा अभ्यास करण्याचे दडपण राहीले नाही. ज्या विद्यार्थ्यांच्या निकालात उत्तरपत्रिका फेरतपासणीमध्ये बदल झाला नाही (NO Change) अशा विद्यार्थ्यांना वेळेत निकाल जाहीर झाल्याने त्या विषयाचा अभ्यास करण्यास वेळ मिळाला आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी समाधान व्यक्त केले आहे.

### *एका दिवसात निकाल जाहीर

मार्च/एप्रिल २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या PGDCAया पदवी अभ्यासक्रमाचा निकाल विद्यापीठ परीक्षा विभागाने एका दिवसात जाहीर केला. सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेची Viva Voce झालेल्या दुस-याच दिवशी दि.२९/४/२०१५ रोजी निकाल संकेतस्थळावर उपलब्ध केला असून विद्यापीठ इतिहासात प्रथमच एकाच दिवसात निकाल जाहीर करण्याचा पराक्रम केला आहे.तसेच विज्ञान विद्याशाखातंर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमातील M.Sc.Applied Geology. M.Sc. Environmental Science व M.Sc. Geoinformatics या परीक्षांचे निकाल केवळ ५ ते ८ दिवसात जाहीर करण्यात आलेले आहेत.

## *बी. ए. भाग- ३ चा निकाल १५ दिवसात जाहीर

मार्च/एप्रिल २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या कला विद्याशाखेतंर्गत बी. ए. भाग- ३ सत्र ५ व ६ या परीक्षेचा निकाल अवघ्या १५ दिवसात जाहीर करण्यात आला. या अभ्यासक्रमाचा निकाल विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध केला आहे. जवळपास आठ हजार विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले होते. या परीक्षेचा शेवटचा पेपर दि.१६/४/२०१५ होता. त्यानुसार १५ व्या दिवशी म्हणजे दि. ३०/४/२०१५ जाहीर करण्यात आला. इतिहासात प्रथमच बी. ए. परीक्षेचा निकाल १५ व्या दिवशी निकाल जाहीर करण्याची कामगिरी विद्यापीठाने केली. यापुढेही सर्व परीक्षांचे निकाल विहित मुदतीत जाहीर करण्यासाठी सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक व इतर घटकांनी अशाच प्रकारे सहकार्य करावे असे आवाहन परीक्षा विभागाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## व्यावसायिक अभ्यासक्रामांच्या परीक्षांना Online प्रश्नपत्रिका वितरण पध्दतीने यशस्वी सुरवात.

गेल्या परीक्षेच्या वेळी नव्यानेच प्रयोग केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रामांच्या परीक्षांना Online प्रश्नपत्रिका वितरीत केल्या प्रमाणे याही परीक्षांना (बी.एड., बी.पीएड. एम.एड. एम.पीएड./ अभियांत्रिकी (Engineering) ,एम.सी.ए. व एम.बी.ए. या परीक्षांच्या Online DEPDS या प्रणाली व्दारे जवळपास ३० परीक्षा केंद्रावर पेपर सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर Online पध्दतीने प्रश्नपत्रिका पाठविण्यास दि.०५ मे, पासून यशस्वीरित्या सुरवात झाली. अभियांत्रिकी विद्याशाखांच्या सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका या स्पर्धा परीक्षा, MPSC/UPSC , GATE या धर्तीवर (A,B,C, D Set ) वेगवेगळया चार संचात तयार करण्यात येत आहेत. यामुळे विद्यार्थ्याची MPSC/UPSC , GATE या परीक्षांची पूर्व तयारी होते. या Online DEPDS या प्रणाली व्दारे Online प्रश्नपत्रिका वितरण व अभियांत्रिकी विद्याशाखांच्या सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका या स्पर्धा परीक्षा, MPSC/UPSC, GATE या धर्तीवर (A,B,C, D Set ) वेगवेगळया चार संच या संकल्पनेची मा. कुलपती (राजभवन)कार्यालयाने नोंद घेवून विद्यापीठाचे याबाबतीत कौतुक केले आहे. तसेच परीक्षा पध्दतीमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या राजेश अग्रवाल समितीच्या शिफारीशींच्या अमंलबजावणीचा भाग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सोलापूर विद्यापीठ परीक्षा विभागाने Social networking site च्या माध्यमातून Whats app वर ICT-SUS या नावांने ग्रुप तयार करून ऑनलाईन प्रश्नपत्रिकेच्या कार्यप्रणालीसाठी आवश्यक त्या सूचना व संपर्क ठेवण्यासाठी या माध्यमाचा वापर करण्यात येत आहे. यामुळे सर्व घटकांशी संपर्क ठेवणे सोईचे व विना खर्चाचे आहे.